14/10/15 हिंदुस्थान

# स्पर्धा परीक्षेसाठी अमरावती विद्यापीठातर्फे नि:शुल्क मार्गदर्शन वर्गाचे आयोजन

अमरावती (प्रतिनिधी)

**स्पर्धात्मक युगात विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत मागे राहू नये व त्याला स्पर्धा परीक्षेची माहिती मिळावी आणि त्यातून प्रशासकीय नोकऱ्यात प्रवेश मिळावा या उद्देशाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाव्दारे २ महिने कालावधीचे नि:शुल्क स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात येत आहे.**

सदर वर्गातून एम. पी. एस. सी. रेल्वे, बँक, स्टाफ- सिलेक्शन कमिशन व विशेषत: महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जाहिर केलेल्या विक्रीकर निरीक्षक ( एस. टी. आय.) कर सहाय्यक (टॅक्स असिस्टंट) व आयोगाच्या २०१५ या वर्षातील जाहिर करण्यात आलेल्या वेळापत्रकाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात येत आहे. हे वर्ग सोमवार दि. १९ ऑक्टोबर पासून सुरू होत आहे.

नि:शुल्क मार्गदर्शन वर्गात प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या होतकरू उमेदवारांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील मुलांच्या वसतीगृहासमोरील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात १० ते १६ ऑक्टोबर पर्यंत दुपारी १२ ते ४ दरम्यान संपर्क साधून प्रवेशाचे अर्ज सादर करायचे आहेत. प्रवेशाचे अर्ज मार्गदर्शन केंद्रातच नि:शुल्क उपलब्ध असून तेथेच भरून द्यावे लागणार आहे. त्याकरिता सोबत २ फोटो व कोणतेही एक मुळ ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. ओळखपत्राशिवाय प्रवेश अर्ज मिळणार नाहीत. अर्ज केलेल्या उमेदवारांची प्रवेश पूर्व परीक्षा रविवार दि. १८ ऑक्टोबर रोजी सकाळी ठिक १० वाजता विद्यापीठ परिसरात घेतली जाईल.

सदर मार्गदर्शन वर्ग अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक, इतर मागासवर्ग (नॉन क्रिमिलेयर), खुल्या संवर्गातील परंतु दारिद्रय रेषेखालील (बी. पी. एल. कार्डधारक) उमेदवारांसाठीच आहेत.

सं. गा. बा. अमरावती विद्यापीठातर्फे स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात येत असून या मार्गदर्शन वर्गाचा लाभ घेण्याचे आवाहन सं. गा. बा. अमरावती विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक श्री. डॉ. एस. के. ओमनवार यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी उमेदवारांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सं. गा. बा. अमरावती विद्यापीठ येथे ०७२१-२६६५५७९, प्रा. वैभव मस्के - ९४२२१५७७४५, विपुल बागडे ८८०६५६६००१, यांच्याशी संपर्क साधावा.